Est. Sept 1994 2(f) & 12 (B): March 2006

Hanuman Shikshan Prasarak Mandal, Sonpeth's

LATE RAMESH WARPUDKAR ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, SONPETH. DIST. PARBHANI 431516 (MS)

NAAC Accredited with Grade- B

(Affiliated to: Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)

Ph. (02453) 240 142 Fax. (02453)240 142 Principal: 09423 779 000

Web: www.warpudkarcollege.com Email:lrwcsnpt@rediffmail.com./shreyavasant2010@gmail.com

**Shri. P.R. Kadam**
President

**Dr. V.D. Satpute**
Principal

## Departmental Activity Report

- **Name of the Department: _sociology____**

1. **Name of the Activity: --One day industry and financial literacy workshop through zoom meeting.**
2. Date: 21/1/22---------------
3. Place & Time:-on zoom meeting 12:00 pm-----
4. **Objectives of the Programme**:- To create awareness among women about the industry, to convince women of the need for financial literacy, to increase self-confidence among women, to encourage women to participate in financial decision-making processes, to encourage women to take on family and extra-family responsibilities.
5. **Guests/Resource Persons**:--Dr Anjali Joshi, head of the department, Dayanand arts college Latur ,Dr Pratibha biradar head of the department of sociology Mauli mahavidyalaya, Wadala, Solapur.
6. **Abstract of the Programme:** ---Department of Sociology in Ramesh Varpukar College and Municipal Council Gangakhed organized an online workshop on Industry and Financial Literacy on 21 January 2022. In this workshop, Professor Dr. Anjali Joshi Department of Sociology Dayanand Kala to guide the issue of women development and need for financial literacy in industry. College Latur and Dr. Pratibha Biradar Head of Department of Sociology Mauli College Wadala Solapur were invited. The dignitaries interacted with the women of self-help groups through Zoom meeting. Dr. Anjali Joshi said that self-help groups are becoming a means of women's empowerment and it is being pointed out that ordinary women are creating their new identity in the society through self-help groups, also, there is an urgent need for women in self-help groups to take joint decisions and implement them in order to empower women financially. The government has provided an opportunity to rural women to create a new identity for their self-help group by starting small scale industries, cottage industries, animal husbandry with the help of funds from the group and with the help of various schemes of the government without establishing a self-help group only to meet financial needs and it is time for all women to seize this opportunity Dr. Anjali Joshi appealed to the women of self-help groups to realize that today has come.---Dr. Pratibha Biradar, while guiding on financial literacy, women should know what money is, what we can do with money, where and for what, how money should be spent, that is, financial literacy. Financial literacy is also the way we plan money for the future. If we are not aware of this, various types of financial problems can arise in our life, she said. Women need to

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ सोनपेठ संचलित

# कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी

## समाजशास्त्र विभाग /समिती

## शैक्षणिक वर्ष : 2021-2022

| भाग – अ | | |
|---|---|---|
| उपक्रम / कार्यक्रमाचे क्रमांक | | 6 |
| उपक्रम / कार्यक्रमाचे नाव | | एक दिवशीय कार्यशाळा |
| दिनांक- | | 21 जानेवारी 2022 |
| उपक्रम / कार्यक्रमाचे स्वरूप | | 21 जानेवारी 2022 रोजी समाजशास्त्र विभाग व नगरपरिषद सोनपेठ यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय उद्योग आणि आर्थिक साक्षरता कार्यशाळा झुम मीटिंगच्या माध्यमातून आयोजित करण्यात आली. कार्यशाळेत डॉ. अंजली जोशी, दयानंद महाविद्यालय, लातूर आणि डॉ. प्रतिभा बिरादार, समाजशास्त्र विभाग, माऊली महाविद्यालय वडाळा, सोलापूर यांना आमंत्रित करण्यात आले होते. मान्यवरांनी कार्यशाळेत सहभागी महिलांना आभासी मंचाच्याच्या बचत गटातील महिलांना मार्गदर्शन केले. |
| उद्देश | १ | महिलांमध्ये उद्योगा बाबत जनजागृती करणे |
| | २ | आर्थिक साक्षरतेची गरज पटवून देणे |
| | ३ | महिलांमधील आत्मविश्वास वाढवणे |
| | ४ | महिलांना आर्थिक निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रेरित करणे |
| | ५ | कौटुंबिक आणि कुटुंबा व्यतिरिक्त जबाबदारी पेलण्यासाठी प्रोत्साहित करणे |
| प्रमुख पाहुणे / मार्गदर्शक / व्याख्याते | | डॉक्टर अंजली जोशी दयानंद महाविद्यालय लातूर डॉक्टर प्रतिभा बिरादार माऊली महाविद्यालय वडाळा सोलापूर |
| उद्घाटक | | प्राचार्य डॉ वसंत सातपुते |
| ठिकाण | | |
| उपस्थिती | विद्यार्थी | 35 |
| | कर्मचारी | 10 |
| | इतर | 7 |
| | एकूण | 52 |

Late. Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

| भाग – ब |
|---|
| |

प्रस्तूचे विवरण | झालेला ...

उपक्रम / कार्यक्रमाचे क्रमांक संक्षिप्त विवरण

कै.रामे वरपुडकर महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग आणि नगरपरिषद गंगाखेड यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 21 जानेवारी 2022 रोजी उद्योग आणि आर्थिक साक्षरता जनजागृती एकदिवसीय ऑनलाईन कार्यशाळा आयोजित करण्यात आली.या कार्यशाळेत उद्योगात द्वारे महिला विकास आणि गरज आर्थिक साक्षरतेची या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी प्रोफेसर डॉक्टर अंजली जोशी समाजशास्त्र विभाग दयानंद कला महाविद्यालय लातूर व डॉक्टर प्रतिभा बिरादार समाजशास्त्र विभाग प्रमुख माऊली महाविद्यालय वडाळा सोलापूर यांना आमंत्रित करण्यात आले. झुम मीटिंगच्या माध्यमातून मान्यवरांनी बचत गटातील महिलांशी संवाद साधला. डॉक्टर अंजली जोशी यांनी बचत गट महिला सक्षमीकरणाचे माध्यम बनत असून बचत गटाद्वारे सर्वसामान्य महिला आपली नवीन ओळख समाजात निर्माण करत असल्याचे निदर्शनास येत आहे.तसेच महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी बचत गटातील महिलांनी संयुक्तपणे निर्णय घेऊन ते कार्यान्वित करण्याचे आज नितांत गरज आहे असे त्या म्हणाल्या. केवळ आर्थिक गरज पूर्ण करण्यासाठी बचत गटन स्थापन न करता गटातील रकमेच्या साह्याने तसेच शासनाच्या विविध योजनांची मदत घेऊन ग्रामीण महिलांनी लघुउद्योग, कटीर उद्योग, पशुपालन करून आपल्या बचत गटाची नवीन ओळख निर्माण करण्याची संधी शासनाने त्यांना उपलब्ध करून दिली आहे आणि या संधीचे सोने सर्व महिलांनी करण्याची वेळ आज आली आहे याची जाणीव बचत गटातील महिलांनी बाळगावी असे आवाहन डॉ.अंजली जोशी यांनी महिला बचत गटातील महिलांशी संवाद साधताना केले डॉ.प्रतिभा बिरादार यांनी आर्थिक साक्षरतेवर मार्गदर्शन करताना महिलांनी महिलांनी पैसा काय आहे, पैशाच्या साह्याने आपण काय करू शकतो, पैसा कुठे आणि कशासाठी, कशा पद्धतीने खर्च करायला हवा या सर्व गोष्टींची माहिती असणे म्हणजेच आर्थिक साक्षरता होय असे मत मांडले. भविष्याच्या दृष्टीने आपण पैशाचे नियोजन करतो ते सुद्धा आर्थिक साक्षरताच आहे. जर या गोष्टीची आपल्याला माहिती नसेल तर आपल्या जीवनात विविध प्रकारच्या आर्थिक समस्या निर्माण होऊ शकतात असे त्या म्हणाल्या.आर्थिक गुंतवणूक करताना महिलांनी जागरूकता बाळगणे गरजेचे आहे तसेच ज्याप्रमाणे आपण कुटुंबाचे आर्थिक नियोजन करतो त्याचप्रमाणे आपण बचत गटातील सर्व महिलांनी नवीन उद्योग चालू करून त्याचे आर्थिक नियोजनही केले पाहिजे, मानवी जीवनात दोन मोठे पैलू आहेत ते म्हणजे पैसा आणि शिक्षण. या दोन्हीचा विचार केला तर समाजातील प्रत्येक गरीब-श्रीमंत, तरुण-वृद्ध, शिक्षित-अशिक्षित स्त्री पुरुष यांच्यासाठी आर्थिक साक्षरता ही खूप महत्त्वाचे आहे. कुटुंबातील आर्थिक निर्णय प्रक्रियेत सुद्धा महिलांनी सहभागी असणे गरजेचे आहे.घंआर्थिक साक्षरता महिलांना कुटुंबात आणि कुटुंबा बाहेर वावरताना निश्चितच उपयुक्त ठरते महिलांनी ऑनलाईन आर्थिक व्यवहार तसेच कसे होतात याची उत्तम होत माहिती जाणून घेणे गरजेचे आहे आणि ती आज काळाची गरज असल्याचे डॉ.बिरादार म्हणाल्या.उद्योग आणि आर्थिक साक्षरता जनजागृती कार्यशाळा आयोजित करण्यासाठी हनुमान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माननीय परमेश्वर कदम उपाध्यक्ष सौ.ज्येती ताई कदम, मा. विजय कुमार जी तापडिया नगराध्यक्ष गंगाखेड यांनी मार्गदर्शन केले तर प्राचार्य डॉक्टर वसंत सातपुते, माननीय देविदासराव जाधव मुख्याधिकारी नगरपरिषद गंगाखेड यांनी कार्यशाळेचे आयोजन करून महत्त्वपूर्ण जबाबदारी पूर्ण केले या कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. डॉ सूनिता टेंगसे यांनी सत्रसंचलन केले आणि सौ. अंजना बिडगर ,प्रकल्प अधिकारी नगर परिषद गंगाखेड सौ.जयमला हजारे समुदाय संघटक नगरपरिषद गंगाखेड यांनी कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. या ऑनलाइन कार्यशाळेचे तांत्रिक सहाय्यक डॉक्टर मुकुंदराज पाटील होते.या कार्यशाळेत बचत गटातील महिला बहुसंख्येने सहभागी झाल्या होत्या तसेच प्राध्यापक विद्यार्थिनी या कार्यशाळेत सहभाग नोंदवला या कार्यशाळेची सूत्रसंचालन डॉक्टर सुनिता यांनी केले तर आभार सौ.अंजना बिडगर यांनी मानले .

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

| उपक्रम / कार्यक्रमाची उपयुक्तता |
|---|
| महाराष्ट्र शासन ग्रामीण महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करून उद्योग व्यवसायांमध्ये सहभागी करून घेण्यासाठी बचत गट तयार करण्यात आलेली आहे. त्या महिलांना आर्थिक दृष्ट्या साक्षर करून सक्षमीकरणासाठी प्रोत्साहित करण्याच्या हेतूने वेगवेगळे अभियान,कार्यक्रम, योजना राबवल्या जातात ,त्यांना बळ देण्याच्या हेतूने व महिलांना प्रोत्साहित करण्याच्या हेतूने या कार्यशाळेच्या आयोजन समाजशास्त्र विभाग यांच्या माध्यमातून करण्यात आले. शाळेच्या माध्यमातून इतर विद्यापीठातील तज्ञ महिला प्राध्यापकांना महिलांशी संवाद साधण्यासाठी झोप मीटिंगच्या माध्यमातून संधी उपलब्ध करून देणे शक्य झाले |

भाग – क

उपक्रम / कार्यक्रमाचे खर्चाचे विवरण

| अ क्र | खर्च करण्यात आलेल्या वस्तूचे विवरण | झालेला खर्च (रु) | शेरा |
|---|---|---|---|
| | झूम रिचार्ज,बॅनर, , | 2100रू. | Late Ramesh Warpudkar Colleege Sonpeth Dist.Parbhani (M.S.) |
| एकूण खर्च | | 2100रू | |

अहवाल सादर करणाऱ्या समिती / विभाग : समाजशास्त्र विभाग

| पद | नाव डॉ सुनिता टेंगसे | स्वाक्षरी |
|---|---|---|
| समिती अध्यक्ष/ विभाग प्रमुख | डॉ सुनिता टेंगसे | [signature] |
| समन्वयक | डॉ सुनिता टेंगसे | |
| सदस्य | सौ.अंजना बिगर,सौ. जयमाला हजारे गंगाखेड | Hajare |

अहवाल सदर केल्याचा दिनांक : 22 /1 /2022

टीप: सोबत कार्यक्रमाचे GEO TAGGED फोटो व वर्तमानपत्रातील बातम्या जोडाव्यात

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ संचालित

# कै रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ, जिल्हा परभणी समाजशास्त्र विभाग आणि दिनदयाल अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान नगरषरिषद गंगाखेड. आयोजित एक दिवसीय ऑनलाइन कार्यशाळा

## विषयः उद्योग आणि आर्थिक साक्षरता जनजागृती

दि.२१/१/२०२२ वार:शुक्रवार
वेळ :दुपारी १२ वाजता

zoom https://us02web.zoom.us/j/87579235567?pwd=aTIySDhPM2lZbGJRUGxEZlBERUZMZz09

| विषय | प्रमुख व्याख्याते | |
|---|---|---|
| उद्योगाद्वारे महिला विकास | **प्रो.डॉ. अंजली जोशी**<br>समाजशास्त्र विभाग प्रमुख,<br>दयानंद कला महाविद्यालय, लातूर. |  |
| गरज आर्थिक साक्षरतेची | **डॉ. प्रतिभा बिरादार**<br>समाजशास्त्र विभाग प्रमुख,<br>माऊली महाविद्यालय वडाळा, सोलापुर |  |

### ✻ मार्गदर्शक ✻

**मा.श्री.परमेश्वर कदम**
अध्यक्ष, हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ, सोनपेठ

**सौ.ज्योतीताई शिंदे (कदम)**
उपाध्यक्षा, हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ, सोनपेठ

**मा.श्री.विजयकुमार तापडीया,**
अध्यक्ष, नगर परिषद ,गंगाखेड

### ✻ कार्यशाळा आयोजक ✻

**प्राचार्य डॉ.वसंत सातपुते**
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ

**मा.श्री.देविदास जाधव,**
मुख्याधिकारी, नगर परिषद ,गंगाखेड

### ✻ कार्यशाळा समन्वयक ✻

**प्रा.डॉ.सुनिता टेंगसे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ

**सौ.अंजना बिडगर**
सहाय्यक प्रकल्प अधिकारी, नगर परिषद,गंगाखेड.


**सौ.जयमाला हजारे**
समुदाय संघटक, नगर परिषद गंगाखेड.

### ✻ तांत्रिक सहाय्यक ✻


**प्रा.डॉ.मुकुंदराज पाटील**
वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख, कै रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ


Late.Ramesh Warpudkar College Sopneth Dist.Parbhani (M.S.)




Late.Ramesh Warpudkar College
Sopneth
Dist.Parbhani
(M.S.)




Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

साईधमध्ये प्राधान्यक्रमा देणे आवश्यक आहे. मात्र गावातील खरे लाभार्थी घरकुल योजनेपासून वंचित राहत आहेत. राजकीय हेवेदाव्यामुळे घरकुल लाभार्थींची

शिवाजी जाधव, बाळासाहेब तरवटे, गोविंद पवार, ज्ञानेश्वर पुंजारे, श्याम भोग, नकुल होगे, रामेश्वर जाधव व वैभव संघई इत्यादींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



बोरी : शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त बोरी ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळ वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी हनुमान बोबडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. पवार, भागवत भेरजे, संदीप अंभुरे, रवी देशमुख, रोहिदास मोगल, रविकांत देशमुख, प्रकाश चौधरी, मधुकर नवघरे व इतर

# कै. रमेश वरपुडकर महाविद्यालयात उद्योग, आर्थिक साक्षरता कार्यशाळा

देशोन्नती वृत्तसंकलन....

सोनपेठ ■ येथील कै. रमेश वरपुडकर महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग आणि दिनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार २१ जानेवारी रोजी एकदिवसीय उद्योग आणि आर्थिक जनजागृती ऑनलाईन कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेत दयानंद महाविद्यालय लातूर येथील डॉ. अंजली जोशी, माऊली महाविद्यालय वडाळा जि. सोलापुर येथील डॉ. प्रतिभा बिराजदार यांनी यांनी मार्गदर्शन केले. डॉ. अंजली जोशी यांनी बचत गट महिला सक्षमीकरणाचे एक माध्यम बनत असुन बचतगटाद्वारे सर्वसामान्य महिला आपले जीवनमान उंचावत आहेत. बचत गटाच्या माध्यमातुन महिला लघु, कुटीर उद्योग, पशु पालनाच्या माध्यमातुन स्वतःची ओळख निर्माण करत असल्याचे सांगुन त्यांनी महिलांशी संवाद साधला. डॉ. बिरादार आर्थिक साक्षरतेवर मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की, पैसा काय आहे. पैशाच्या सहाय्याने आपण काय करु शकतो, पैसा कुठे आणि कशासाठी, कशा पद्धतीने खर्च करायला हवा याची जाणीव असणे म्हणजे आर्थिक साक्षरता होय. पैशाचे नियोजन करता आले नाही तर जीवनात विविध प्रकारचे आर्थिक समस्या निर्माण होवु शकतात. यासाठी आर्थिकतेच्या बाबतीत महिलांनी जागरुकता बाळगावी असे त्यांनी सांगीतले. त्याच बरोबर हशिप्र मंडळाचे अध्यक्ष परमेश्वर कदम, ज्योती कदम, गंगाखेडचे नगराध्यक्ष विजयकुमार तापडीया, प्राचार्य डॉ. वसंत सातपुते, मुख्याधिकारी देविदास जाधव यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेसाठी तांत्रीक सहाय्यक म्हणुन प्रा. डॉ. मुकूंदराज पाटील, कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. सुनिता टेंगसे यांनी तर आभार अंजना बीडगर यांनी मानले.

## शहरात विना मास्क फिरणाऱ्यावर कारवाई

परभणी ■ कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव वाढत असल्याने पोलीस, मनपा प्रशासन शहरातील चौका चौकात थांबुन विना मास्क फिरणाऱ्यांना दंडात्मक कारवाई करीत आहे.

शहरातील शिवाजी पुतळा, काळी कमान, जिंतूर रोड यासह बाजारपेठ परिसरातही कर्मचाऱ्यांची पथके फिरुन विना मास्क फिरणाऱ्यांना थांबवुन दंड वसुल करत आहेत.

भारत देशाच्या २९ राज्यांपैकी ओडिशा हे एक राज्य आहे. ओडिशा भारताच्या पूर्व किनारपट्टीवर उतरेला असून

## झरी येथे महापुरुषांच्या मूर्ती सभागृहांना अर्पण

Late.Ramesh Warpudkar Colleege
Sonpeth Dist.Parbhani (M.S.)